ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture) योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२४

**संदर्भ:** १) सचिव, कृषि व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक १४ जून, २०२२ आणि दिनांक २२ जून, २०२२ चे पत्र

२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२

३) राज्यात योजना राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यात झालेला सामंजस्य करार दिनांक ११ जुलै, २०२३

४) केंद्र शासनाचे अ.शा. पत्र दिनांक ०३ एप्रिल, २०२४

५) राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्याच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त, महसूल व वन विभागाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४

६) जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.रा.भू.३/AgriStack/प्रस्ताव/पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, २०२४

७) केंद्र शासनाच्या डिजीटल कृषि अभियान संदर्भातील मार्गदर्शक सूचना

८)कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.कृषिआ/कृ.ग./ॲग्रीस्टॅक/२४५२४/२०२४, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४.

**प्रस्तावना :**

भारत एक कृषिप्रधान देश असून, देशाची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास कृषि क्षेत्राच्या विकासामुळेच शक्य होणार आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अन्नधान्य उपलब्धता, शेती आणि शेती संलग्न व्यवसाय इ. जोपासणे, कृषि मालास साठवणूक सुविधा, योग्य बाजारपेठ, भाव तसेच कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कृषि क्षेत्राशी संबंधित लोकसंख्या ५५ टक्के आहे. कृषि क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध संसाधनांचा उचित विनियोग करुन योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहचवून कृषि क्षेत्राचा अधिकाधिक विकास शक्य आहे.

केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ॲग्रिस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. कृषि क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रिस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषि उपक्रमांची कार्यक्षमता सुधारणे शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषि-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होईल.

विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना लाभ देताना आधार प्रणालीचा वापर करुन लाभार्थींची ओळख पटविण्यात येते. तसेच महसूल विभागाने त्यांच्याकडील अधिकार अभिलेखाचे तसेच गाव नकाशांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. सदर अभिलेखांपैकी अधिकार अभिलेख हे संगणकीय पद्धतीने अद्ययावत केले जात असल्याकारणाने तात्काळ उपलब्ध होऊ शकतात. याशिवाय महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्थेने राज्यातील जमिनींचे भू संदर्भीकरण (जिओ रेफरन्सिंग) करुन दिले आहे. यामुळे शेत जमिनीची इत्यंभूत अद्ययावत माहिती डिजिटाईज स्वरुपात तात्काळ उपलब्ध होत आहे.

त्यामुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच तयार करण्यासाठी आवश्यक मूलभूत माहिती उपलब्ध आहे. याचा वापर करुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबविणे शक्य आहे.

बीड जिल्ह्यात २०२३-२४ या वर्षात ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांचा आधार जोडणी केलेला माहिती संच निर्मिती करण्याचा पथदर्शी कार्यक्रम राज्यात राबविण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात संकलित शेतकरी माहिती संचाच्या आधारे जनसमर्थ योजनेच्या माध्यमातून राज्याचे मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते प्रायोगिक स्वरुपात १५ ते ४५ मिनिटांत ६ शेतकऱ्यांना ऑनलाईन किसान क्रेडिट कार्ड (पीक कर्ज) उपलब्ध करुन देण्यात आले. बीड जिल्ह्यातील पथदर्शी कार्यक्रमातील या आशादायक व दूरगामी परिणाम करणाऱ्या अनुभवावरुन महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात कालबद्ध पद्धतीने ॲग्रिस्टॅक योजना अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे. यासाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनानुसार आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्वतयारी जमाबंदी आयुक्त व कृषि आयुक्त स्तरावर करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने कृषि आयुक्त कार्यालयाने संदर्भिय पत्र क्र. १० येथील दिनांक ०३.१०.२०२४ च्या पत्रान्वये ॲग्रिस्टॅक योजनेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

उपरोक्त अनुसार केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture) योजना राज्यात राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय:**

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture) योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२. ॲग्रिस्टॅक योजनेची उद्दिष्टे:-**

**२.१** राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व सातत्याने अद्ययावत करणे.

**२.२** राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र-राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक पद्धतीने तसेच वेळेवर उपलब्ध करणे.

**२.३** शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च-गुणवत्तेची कृषि निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.

**२.४** शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळवून देणे.

**२.५** शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटवण्याची पारदर्शक व सोपी पद्धत विकसीत करणे तसेच प्रमाणिकरणाची सुलभ पद्धत विकसित करणे.

**२.६** राज्यातील शेतकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी कृषि व संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे.

**२.७** उच्च-गुणवत्तेचा डेटा व ॲग्रि-टेकद्वारे कृषि उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे.

**३. योजनेचे अपेक्षित फायदे:**

३.१ पीएम किसान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल.

३.२ पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल.

३.३ शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता राहील.

३.४ पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल.

३.५ किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल.

३.६ शेतकऱ्यांसाठी कृषि कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणांना कृषि सेवा सहजपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभता येईल.

३.७ शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी, कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) च्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांची वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही.

३.८ शेतकऱ्यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थांकडून शेतकऱ्यांना संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविन्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार-प्रचारात सफलता प्राप्त होईल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता ॲग्रिस्टॅक योजनेची राज्यात सुयोग्य अंमलबजावणी कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने भारत सरकार सोबत सामंजस्य करार (MoU) दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी केला आहे.

## ४. ॲग्रिस्टॅक योजनेचे प्रमुख्य घटक:-

AgriStack योजनेअंतर्गत पुढीलप्रमाणे तीन पायाभूत माहिती संच निर्माण करण्यात येणार आहेत. सदर तीनही पायाभूत माहिती संच हे ॲग्रिस्टॅक योजनेसाठी आवश्यक इतर माहिती संच जसे बियाण्यांचा माहिती संच, कीटकनाशकांचा माहिती संच, मागणी बाबतचा माहिती संच, पुरवठ्याचा माहिती संच आदी कृषि विषयक धोरण आखणे व सबसिडी आधारीत योजना निर्मितीसाठी आवश्यक आहे.

अ) शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (Farmers Registry).

ब) हंगामी पिकांचा माहिती संच (Crop Sown Registry)

क) भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map)

## ५. ॲग्रिस्टॅक योजनेचे संनियंत्रण व अंमलबजावणी:

ॲग्रिस्टॅक योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी, नियमित संनियंत्रण आणि आवश्यक प्रशासकीय आणि वित्तीय धोरण आखणीसाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये संनियंत्रण समिती (Steering Committee) व अंमलबजावणी समितीचे (Implementing Committee) गठित करण्यात आली होती. उक्त शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे आणि पुढीलप्रमाणे सुधारणेसह सुकाणू समिती व अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहेत.

## ५.१ सुकाणू समिती (Steering Committee) :

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव वित्त विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव नियोजन विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |
| ६. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ७. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ८. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ९. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय | सदस्य |
| १०. | प्रतिनिधी, कृषि व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार. | सदस्य |
| ११. | इतर सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव आवश्यकतेनुसार. | निमंत्रित सदस्य |

**सुकाणू समितीची कार्यकक्षा:**

१. सदर समितीस ॲग्रिस्टॅक योजनेच्या योग्य परिणामकारक अंमलबजावणी व यशस्वितेसाठी आवश्यक धोरण आखणीसाठी प्रशासकीय-आर्थिक बाबींसह सर्व प्रकारचे अधिकार असतील.
२. ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या माहितीचा वापर करण्यासाठी कृषि विभागाशिवाय इतर विभागांना अथवा संस्थांना परवानगी देणे. तसेच माहितीच्या वापरासंदर्भात अंतिम अधिकार सुकाणू समितीस राहतील.
३. योजनेच्या अंमलबजावणीचा व कामकाजाचा आढावा घेणे व सनियंत्रण करणे.
४. सदर समितीची किमान त्रैमासिक बैठक घेणे.

## ५.२ अंमलबजावणी समिती (Implementing Committee):

उपरोक्त सुकाणू समितीने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे अंमलबजावणी समिती (Implementation Committee**)** गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ७ | संचालक (माहिती व तंत्रज्ञान), माहिती व तंत्रज्ञान विभाग. | सदस्य |
| ८ | आयुक्त (कृषि), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ९ | आयुक्त (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| १० | सह सचिव (ल-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |

**अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:**

सुकाणू समितीकडून प्राप्त निर्देशानुसार ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत विविध माहिती संच निर्मिती व त्यांचा वापर करणे याबाबत अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

१. योजना अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
२. क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी मार्गदर्शन व संनियंत्रण करणे.
३. माहिती संच निर्मिती व माहिती संच वापर कक्ष गठन आणि कामकाज सनियंत्रण करणे.
४. माहिती संचाच्या विनियोगासाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
५. सदर समितीची किमान द्विमासिक बैठक घेणे.

क्षेत्रिय स्तरावर ॲग्रिस्टॅक योजनेसाठी विविध माहिती संचांची निर्मिती करताना जिल्हा निहाय परिस्थितीनुसार नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर समितीचे गठन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

**५.३ विभागस्तरीय अंमलबजावणी समिती:**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष (संबंधित महसूल विभाग) |
| २ | जिल्हाधिकारी | सदस्य (संबंधित जिल्हा) |

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४ | विभागीय कृषि सहसंचालक | सदस्य (संबंधित विभाग) |
| ५ | उप आयुक्त महसूल | सदस्य सचिव (संबंधित महसूल विभाग) |

**विभागस्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:**

१. विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे नियोजन करणे.
२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी यांचे संनियंत्रण करणे.
३. विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा घेणे आणि संनियंत्रण करणे.
४. राज्य अंमलबजावणी समितीस विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचे प्रगतीचे अहवाल सादर करणे.
५. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

**५.४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती:**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ४ | उप-विभागीय अधिकारी (सर्व) | सदस्य |
| ५ | डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन ऑफिसर,राष्ट्रीय सुचना केंद्र | सदस्य |
| ६ | जिल्हाधिकारी यांनी नामांकन केलेले इतर निमंत्रित | सदस्य |
| ७ | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:**

१. जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे नियोजन करणे.
२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी यांचे संनियंत्रण करणे
३. जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा आणि संनियंत्रण करणे.
४. राज्य अंमलबजावणी समितीस जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचे प्रगतीचे अहवाल सादर करणे.

५. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

**५.५ तालुकास्तरीय अंमलबजावणी समिती :**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | उपविभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २ | गटविकास अधिकारी | सदस्य |
| ३ | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ४ | तहसिलदार | सदस्य सचिव |
| ५ | इतर निमंत्रित सदस्य | सदस्य |

**तालुकास्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:**

१. तालुक्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे सविस्तर नियोजन करणे.
२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ नियुक्ती, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी करणे.
३. तालुक्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिम अंमलबजावणीचा आढावा आणि संनियंत्रण करणे.
४. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

**६. राज्य स्तरीय योजना व्यवस्थापन केंद्राअंतर्गत माहिती निर्मिती कक्ष** (Data Creation Unit) **व माहिती वापर कक्ष** (Data Usage Unit ) **स्थापना:**

राज्य स्तरीय योजना व्यवस्थापन केंद्राअंतर्गत ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष (Data Creation Unit) व माहिती वापर कक्ष (Data Usage Unit) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. माहिती निर्मिती कक्षाकडून माहिती संच निर्मिती व संचांचे अद्ययावतीकरणासाठी आवश्यक संगणक प्रणाली विकसन, व्यवस्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तर माहिती वापर कक्षाकडून माहिती संचांच्या माध्यमातून शेतकरी केंद्रित सेवा सुविधा विकसित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**६.१ माहिती निर्मिती कक्ष** (Data Creation Unit):

माहिती निर्मिती कक्ष हा जमाबंदी आयुक्त यांच्या अधिनस्त असेल व राज्य संचालक, जमाबंदी आयुक्त कार्यालय हे माहिती निर्मिती कक्षाचे नियंत्रक असतील. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत माहिती निर्मिती कक्षासाठी पुढीलप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ बाह्य स्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कक्षाचे कामकाज कक्ष निर्मितीपासून तीन वर्षे चालू राहील.

| अ.क्र. | पदनाम | स्तर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापक | राज्य स्तर | १ |
| २ | वरिष्ठ प्रणाली विकासक | राज्य स्तर | १ |
| ३ | डेटा विशेषज्ञ | राज्य स्तर | १ |
| ४ | प्रचार प्रसिद्धी विशेषज्ञ | राज्य स्तर | १ |
| ५ | विभागीय समन्वयक | सर्व विभाग | ६ |
| ६ | जिल्हा समन्वयक | ३४ जिल्हे | ३४ |

उक्त मनुष्यबळ नियुक्ती, त्याचे निकष, त्यासाठी आवश्यक मानधन, मनुष्यबळात आवश्यकतेनुसार वाढ व अनुषंगिक खर्च तसेच उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या इत्यादीस सुकाणू समितीची मान्यता घेण्यात यावी. कृषि विभागाने सदर कक्षातील मनुष्यबळाच्या मानधनासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Fund/Digital Agriculture Mission मधून तीन वर्ष जमाबंदी आयुक्त यांना उपलब्ध करुन द्यावा. उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या महसूल विभागाने स्वतंत्रपणे निश्चित कराव्यात.

### ६.२ माहिती वापर कक्ष (Data Usage Unit):

माहिती वापर कक्ष हा कृषि आयुक्त यांच्या अधिनस्त असेल व संचालक, (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्त कार्यालय हे माहिती वापर कक्षाचे नियंत्रक असतील. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत माहिती निर्मिती कक्षासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ बाह्य स्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कक्षाचे कामकाज कक्ष निर्मितीपासून तीन वर्षे चालू राहील.

| अ.क्र. | पदनाम | स्तर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ प्रणाली विकासक | राज्य स्तर | १ |
| २ | कनिष्ठ प्रणाली विकासक | राज्य स्तर | १ |
| ३ | डेटा विकासक | राज्य स्तर | १ |
| ४ | डेटा विशेषज्ञ | राज्य स्तर | १ |
| ५ | वरिष्ठ सल्लागार | राज्य स्तर | १ |
| ६ | कनिष्ठ सल्लागार | राज्य स्तर | १ |
| ७ | माहिती व्यवस्थापक | राज्य स्तर | १ |

उक्त मनुष्यबळ नियुक्ती, त्याचे निकष, त्यासाठी आवश्यक मानधन, मनुष्यबळात आवश्यकतेनुसार वाढ व अनुषंगिक खर्च तसेच उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या इत्यादीस सुकाणू समितीची स्वतंत्रपणे मान्यता घेण्यात यावी. सदर कक्षातील मनुष्यबळाच्या

मानधनासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Fund/Digital Agriculture Mission मधून उपलब्ध करण्यात येईल. उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या कृषि विभागाने स्वतंत्रपणे निश्चित कराव्यात.

## ७. **शेतकरी माहिती संच** (Farmer Registry):-

शेतकऱ्याचा माहिती संच तयार करण्यासाठी महसूल अधिकार अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन त्यानुसार शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडावयाचा आहे. या अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांची नावे आणि ओळख आदि माहिती ही त्यांच्या शेतांच्या माहितीसह संकलित केली जाईल. यासाठी महसूल विभागाकडील अधिकार अभिलेखात नमूद शेतकऱ्यांची नावे व त्यांची शेती या डेटाबेसचा वापर करण्यात येईल. शेतकऱ्याची ओळख पटविणारा आधार क्रमांक हा त्याच्या मालकीच्या शेतांशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतांसह एकत्रितरीत्या शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येईल. माहिती संच निर्मितीची प्रक्रिया ही महसूल विभाग, कृषि विभाग व ग्राम विकास विभागाकडील ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांकडून भारत सरकारने विकसित केलेल्या मोबाइल ॲपचा वापर करुन करण्यात येईल. प्रथम जास्तीत जास्त शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीची कार्यवाही मोहीम स्वरुपात पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर शेतकरी ओळख क्रमांक मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना ग्राहकसेवा केंद्रे जसे व्हीएलई, महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र इत्यादी द्वारे अर्ज करता येईल. सदर माहिती संच निर्मितीसाठी चार प्रमुख प्रक्रिया राबवावयच्या आहेत:-

i. शेतकऱ्यांच्या माहिती संचासाठी सॉफ्टवेअर प्रणाली (तलाठी व कृषि सहाय्यक /ग्रामसेवक यांचेसाठी मोबाईल ॲप्लीकेशन्स)
ii. शेतकऱ्याचा माहिती संच निर्मिती साठी काम करणाऱ्या कर्मचारी यांचे प्रशिक्षण.
iii. शेतकरी माहिती संच निर्मितीची क्षेत्रीय स्तरावरील माहिती गोळा व पडताळणी प्रक्रिया.
iv. माहिती संच निर्मिती नंतर त्याची देखभाल दुरुस्ती आणि अद्ययावतीकरण.

## ८. **शेतकरी माहिती संच** (Farmer Registry) **निर्मिती कार्यपद्धती:**

८.१ शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने केंद्र सरकारला अधिकार अभिलेखांचा माहिती संच उपलब्ध करुन दिला असून, हा माहिती संच API द्वारे सातत्याने अद्ययावत करण्यात येईल. केंद्र शासनाने विकसित केलेल्या बकेटिंग सॉफ्टवेअर प्रणालीने प्रत्येक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी या माहिती संचाच्या आधारे एकत्रित

केल्या आहेत. तसेच राज्यात कृषि विभागाच्या विविध योजना अंमलबजावणी करताना निर्माण करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या माहिती संचांमधून शेतकऱ्यांचे उपलब्ध झालेले आधार व इतर माहिती जोडण्यात आली आहे. अशी प्रत्येक शेतकऱ्याची एकत्रिकृत माहिती याला त्या शेतकऱ्यांची फार्मर्स बकेट असे म्हणण्यात येते. केंद्र शासनाकडून प्राप्त गाव निहाय फार्मर्स बकेटचा डेटा हा शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यासाठी माहितीचा मसुदा म्हणून वापरण्यात येईल.

८.२ वर नमूद केल्यानुसार फार्मर्स बकेटची माहिती क्षेत्रिय स्तरावरुन तलाठ्यामार्फत शेतकऱ्याची व त्याच्या शेतांची ओळख पटवून निश्चित केली जाईल. कृषि विभागाकडून शेतकऱ्याचा आधार जोडणी घेतली जाईल. त्यानंतर संबंधित शेतकऱ्यास शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) देण्यात येईल. शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्याचे (Farmer Id Creation) कामकाज मोहीम स्वरुपात राबविण्यात यावे. या मोहिमेसाठी संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त हे त्यांच्या विभागाचे नोडल अधिकारी म्हणून कामकाज करतील व सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अंमलबजावणी अधिकारी असतील.

८.३ मोहिमेसाठी जिल्हाधिकारी यांच्या निर्देशाखाली सर्व तहसीलदार त्यांच्या तालुक्यातील गावांचे तालुका गावनिहाय पथक निर्माण करतील. प्रत्येक पथकामध्ये तलाठी आणि ग्रामसेवक/कृषि सहाय्यक असे दोन अधिकारी नियुक्त करण्यात येतील. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये हे पथक तीन दिवस उपस्थित राहील या प्रमाणे तहसिलदार यांनी नियोजन करावे. सदर पथक हे तीन दिवस गावामध्ये निवासी राहून ॲग्रिस्टॅक योजनेची प्रचार व प्रसिद्धी करेल आणि जास्तीत जास्त शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करेल.

८.४ मोहिमेच्या आदल्या सायंकाळी निवासी पथकाने संबंधित गावामध्ये शक्यतो मुक्कामी जावे, जेणे करुन गावात ग्राम सभा आयोजित करुन ॲग्रिस्टॅक योजनेची माहिती व त्याचे फायदे हे कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांच्या मदतीने तलाठी सर्व गावाला सांगतील.

८.५ पहिला व दुसरा दिवस मोहीम स्वरुपात गावातल्या सार्वजनिक ठिकाणी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांनी कॅम्प निर्माण करावयचा आहे. सदर कॅम्प ॲग्रिस्टॅक योजनेचा असल्याबाबत आवश्यक जनजागृती कण्यासाठी विविध फलक सर्व लोकांना दिसतील अशा ठिकाणी लावणे, त्याबाबतची शेतकऱ्यांना माहिती देणे व त्यांना शेतकरी ओळख क्रमांक घेण्यास प्रवृत्त करणे हे कामकाज मोहिमेच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांनी करावाचे आहे.

८.६ तिसऱ्या दिवशी उर्वरीत शेतकरी विशेषतः महिला शेतकरी यांना घरोघरी भेटी देऊन

त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करणे व गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार करणे यावर भर द्यावा.

८.७ शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करण्यासाठी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांना त्यांच्या मोबाईल वर मोबाईल ॲप प्रस्थापित करुन देण्यात येईल.

८.८ मोबाईल ॲप प्रस्थापित करणे व त्या संबंधित प्रशिक्षण ही कार्यवाही तहसिलदार यांनी ॲग्रिस्टॅक योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त मॅन्युअल नुसार पूर्ण करावयाची आहे.

८.९ तलाठी मोबाईल ॲप द्वारे उपस्थित शेतकऱ्याची ओळख पटवून त्याच्या शेत जमिनीची पडताळणी करतील. ही निश्चिती झाल्यानंतर कृषि सहाय्यक / ग्राम सेवक हे शेतकऱ्याची मोबाईल ॲप द्वारे फार्मर रजिस्ट्रीमध्ये आधार जोडणीसाठी सहमती घेऊन शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करतील.

९. **शेतकरी माहिती संच -प्रशिक्षण व प्रचार प्रसिद्धी :** राज्यस्तरावर प्रति महसूल विभाग कृषि विभागाकडून १ व महसूल विभागाकडून १ अश्या एकूण १२ अधिकाऱ्यांची मास्टर ट्रेनर म्हणून निवड करण्यात यावी. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता प्रत्येक जिल्ह्यातून एक कृषि विभागाचा अधिकारी व एक महसूल विभागाचा अधिकारी यांची जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर म्हणून निवड करण्यात यावी. या सर्व मास्टर ट्रेनर्सना जमाबंदी आयुक्त व कृषि आयक्त यांचे कार्यालया मार्फत संयुक्तरित्या प्रशिक्षण दिले जाईल. हे मास्टर ट्रेनर्स विविध स्तरांवर आणि तालुका व गावात प्रत्यक्ष पथकांना व ट्रेनर्सना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देतील तसेच आवश्यकतेनुसार समस्या निवारण करतील.

१० **शेतकरी माहिती संच साठवणूक:**

राज्य प्रकल्प व्यवस्थापन केंद्राअंतर्गत कामकाज करण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे तयार केलेला माहिती निर्मिती कक्ष हा सदर माहिती संचाची साठवणूक करण्यासाठी योग्य ती क्लाऊड सेवा घेईल. तसेच माहिती संच निर्मिती, देखभाल व अद्यावतीकरण याबाबतची आवश्यक तजवीज करेल.

११ **आर्थिक तजवीज:** शेतकरी माहिती संच निर्मितीसाठी आवश्यक १००% निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Funds/Digital Agriculture Mission योजनेमधून करण्यात येणार आहे. सदर खर्च सुकाणू समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

१२. **हंगामी पिकांचा माहिती संच (Seasonal Crops Registry):-**

महाराष्ट्र राज्यात ई-पीक पाहणी ही संकल्पना २०२१ पासून यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत पीक पाहणी अधिक सुयोग्य व खात्रीशीर होण्याच्या दृष्टीने काही बदल सुचविण्यात आले आहेत. या बदलानंतर ॲग्रिस्टॅक योजनेतील दुसरा महत्त्वाचा माहिती संच म्हणजेच हंगामी पिकांचा माहिती संच तयार होणार आहे. यासाठी मूळ ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार ई-पीक पाहणीस यापुढे “डिजिटल क्रॉप सर्व्हे” असे संबोधित करणेत येईल. डिजिटल क्रॉप सर्व्हे साठी वापरावयाच्या

शेतकऱ्यांच्या हातातील मोबाईल ॲपचे नाव आता “ई-पीक पाहणी डीसीएस” असे करण्यात येत आहे.

डिजिटल क्रॉप सर्व्हे अंतर्गत राज्यातील सर्व शेतांमध्ये पेरलेल्या पिकांचे खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील पीक पाहणी या ई-पीक पाहणी डीसीएस मोबाइल ॲपच्या माध्यमातून करण्यात येईल. ही डिजिटल स्वरुपातील पिक पाहणी प्रत्येक वर्षी खरीप, रब्बी, उन्हाळी हंगाम, तसेच संपूर्ण वर्ष पिके यासाठी महसूल विभागामार्फत करण्यात येईल.

ई-पीक पाहणी डीसीएस या मोबाईल ॲपचा प्रत्येक हंगामामध्ये शेतकऱ्याद्वारे प्रथम वापर करण्यात येईल (सुमारे दीड महिना कालावधी) त्यानंतर उर्वरित कालावधीमध्ये तलाठी (सुमारे एक महिना कालावधी) यांनी त्यांच्या गावात तालुक्याच्या तहसिलदारांकडून नेमलेल्या सहायकाच्या माध्यमातून उर्वरित पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावयाची आहे. मोबाईल ॲपच्या माध्यमातून करावयाच्या पीक पाहणी साठी सहाय्यकाची नेमणूक ही तहसिलदारांनी ग्राम स्तरावरील कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका किंवा तत्सम मानधनावर कामकाज करणारे ग्रामस्तरीय मनुष्यबळ यांचेतून करावयाची आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात महसुली गाव नमुना-१२ पिकांची नोंदवही मधील पीक पेरा नोंदी ई-पीकपाहणी या Mobile App मधून शेतकरी स्वतः करतात व उरलेली माहिती तलाठी Software प्रणालीद्वारे दाखल करतात. आता, भारत सरकारने या कामासाठी निश्चित केलेल्या डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) या प्रणालीच्या मापदंडानुसार पीक पाहणीसाठी दर हंगामाला खालील प्रमाणे प्रक्रिया महसूल व वन विभागाने राबवायच्या आहेत.

**१३. हंगामी पिकांचा माहिती संच (Seasonal Crops Registry) कार्यपद्धती:-**

**१३.१ पीक पाहणी नोंदविण्याची कार्यपद्धती:**

१. शेतकरी दर हंगामाच्या सुरुवातीला त्यांना विहित करुन दिलेल्या कालावधी मध्ये (सुमारे ४५ दिवस) शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या “ई-पीक पाहणी डीसीएस” मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी नोंद करण्यासाठी स्वतःचे नाव ॲपमध्ये नोंदवून नोंदणी पूर्ण करतील. शेतकऱ्यांनी एकदा मोबाईल ॲपवर स्वतःची नाव नोंदणी मोबाईल क्रमांकासह केल्यानंतर पुढील हंगामात नोंदणी करणे आवश्यक नाही.

२. शेतकरी स्तरावरील पीक पाहणीच्या कालावधी मध्ये पीक पाहणी करणेसाठी सहाय्यक यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे तसेच शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्याचे प्रशिक्षण देणे व प्रत्यक्ष पीक पाहणी करताना येणाऱ्या समस्या सोडविणे अशी कार्यवाही करावी.

३. प्रत्येक गावात शेतकऱ्याच्या अनेक शेत जमिनी असतात व त्या शेत जमिनीमध्ये शेतकरी विविध पिकांची लागवड करत असतो. शेतकऱ्याने त्याच्या एका शेतात लावलेली विविध पिके नोंदणी करतील त्या शेत जमिनीस “ओनर्स प्लॉट” म्हणण्यात येते. म्हणजेच शेतकऱ्याचे एका ठिकाणी असलेले जमिनीचे क्षेत्र म्हणजे त्या शेतकऱ्याची एक शेत जमीन याला “ओनर्स प्लॉट” म्हणण्यात येते.

४. हंगामी पिकांचा माहिती संच निर्मिती करताना करावयाची पीक पाहणी ही ओनर्स प्लॉट प्रमाणे करावयची आहे.

५. शेतकरी पीक पाहणी कालावधी संपल्यानंतर सहाय्यकाकडून गावातील उर्वरित पीक पाहणी पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित तलाठ्याची असेल.

६. सहाय्यकांना ही पीक पाहणी नोंदविण्यासाठी ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर मोबाईल ॲप मध्ये शेतकऱ्यांनी न केलेली पीक पाहणी करण्यासाठी उर्वरित ओनर्स प्लॉट उपलब्ध असतील.

७. सहाय्यकाने प्रत्येक शेतजमिनीवर जाऊन पीक पाहणी करावयाची आहे.

## १३.२ शेतकरी स्तरावरील पीक पाहणी:

१. शेतकरी ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपद्वारे नाव नोंदणी करुन ई-पीक पाहणी नोंद करतील.

२. शेतकरी मोबाईल क्रमांक प्रविष्ट करुन आपली नोंदणी करतील.

३. शेतकऱ्यांनी नोंदणी केल्यानंतर त्यांनी आपला खाता क्रमांक निवडून व पुढे सर्व्हे क्रमांक / गट क्रमांक निवडून नोंदणी पूर्ण करावी.

४. ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपमध्ये जिओ फेन्सिंग असल्यामुळे पीक पाहणी नोंदविण्याकरिता शेतकऱ्यांना आपल्या गटामध्ये जाणे अनिवार्य असेल.

५. शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदविण्याकरिता पिकाचे फोटो घेऊन अपलोड करणे अनिवार्य आहे.

६. हंगामी चालू पड किंवा कायम पड नोंदविण्यासाठी सुद्धा गटाच्या हद्दीवर आधारित जिओ फेन्सिंग असल्यामुळे गटामध्ये जाऊन नोंद करणे अनिवार्य असेल.

## १३.३ सहाय्यक नेमणूक करण्यासाठी तहसिलदार स्तरावरील कार्यपद्धती:

१. तहसिलदार प्रत्येक गावासाठी कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका व ग्रामस्तरीय मानधनावर कार्यरत इतर विभागांचे कर्मचारी यामधून एका सहाय्यकाची नियुक्ती करतील.

२. जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट करिता एक सहाय्यक या प्रमाणे सहाय्यकाची नियुक्ती करण्यात येईल.

३. एक गाव किंवा अनेक गावे एकत्र करुन जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट संख्ये पर्यंत पीक पाहणीसाठी सहाय्य करणे व उर्वरित पीक पाहणी नोंदविणे हे कामकाज एका सहाय्यकाला देता येईल.

४. कमी ओनर्स प्लॉट असणाऱ्या गावांचे एकत्रीकरण करुन २ किंवा त्यापेक्षा जास्त गावे एका सहाय्यकास नेमून देण्यात येतील.

५. ज्या गावांमध्ये १५०० पेक्षा जास्त ओनर्स प्लॉट आहेत त्या गावांमध्ये १ पेक्षा अधिक सहाय्यकांची नेमणूक करता येईल.
६. कोणत्याही परिस्थितीमध्ये एका सहाय्यकाकडे १५०० ओनर्स प्लॉट पेक्षा जास्त ओनर्स प्लॉटचे कामकाज देता येणार नाही.
७. सहाय्यक नेमणूक केल्यानंतर सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी संबंधित कर्मचारी डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲप मधून नोंदणी करतील.
८. सहाय्यक नाव नोंदणीस तलाठी हे त्यांचे वेब पोर्टल मधून मंजुरी देतील व त्या नंतरच सहाय्यक मोबाईल ॲप द्वारे पीक पाहणी नोंदवू शकतील.

### १३.४ सहाय्यकाची जबाबदारी:

१. सहाय्यक हा शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधीमध्ये शेतकऱ्यांना पीक पाहणीसाठी मदत करेल, त्यांना येणाऱ्या अडचणी सोडवेल.
२. शेतकरी स्तरावरुन किमान ८० % पीक पाहणी पूर्ण होईल याची खात्री करेल.
३. शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधी संपल्यावर उर्वरित खातेदारांची पीक पाहणी, ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲप मधून त्यांचे लॉगीन ने पूर्ण करणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडेल.
४. शेतकरी स्तरावरुन नोंदवण्यात आलेल्या पीक नोंदीपैकी १००% पडताळणी सहाय्यक स्तरावरुन करण्यात येईल.
५. सहाय्यक स्तरावरुन नोंदविण्यात आलेल्या नोंदीची १००% पडताळणी तलाठी यांचेमार्फत करण्यात येईल. त्यानंतर ई-पीक पाहणी गांव नमुना-१२ वर प्रतिबिंबित करण्यात येईल.
६. शेतकरी स्तरावरील नोंद केलेली पीक पाहणी ४८ तासांपर्यंत मोबाईल ॲपमध्ये दुरुस्त अथवा नष्ट करु शकतील.
७. शेतकरी स्तरावरुन गाव नमुना-१२ वर प्रतिबिंबित करण्यात आलेल्या ई-पीक पाहणी मध्ये आवश्यक असल्यास तलाठी दुरुस्ती अथवा पीक नोंद नष्ट करतील. तलाठी यांनी नष्ट केलेली ई-पीक पाहणी सहायक स्तरावरुन पुनः ई-पीक पाहणी नोंद करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.
८. सहायक स्तरावरून नोंद करण्यात आलेली ई-पीक पाहणी तलाठी स्तरावरून नष्ट केल्यास पुनः सहायकांना मोबाईल ॲप द्वारे ऑनलाईन पीक नोंदणीसाठी उपलब्ध होईल.
९. मंडळ अधिकारी मोबाईल ॲपद्वारे व्हेरीफायर म्हणून लॉगिन करतील. तलाठी यांनी दोनदा नाकारलेल्या सर्व पीक पाहणीच्या नोंदीची पडताळणी करुन मोबाईल ॲप द्वारे नोंदी करतील.

**१३.५ सहाय्यक मानधन:**

१. सहाय्यक यांना ओनर्स प्लॉट निहाय हंगाम निहाय प्रति ओनर्स प्लॉट रु.५/- एवढे मानधन देण्यात येईल (गावातील किमान ६०% पीकपाहणी शेतकऱ्यांकडून झाली असल्यास हे मानधन अदा करण्यात येईल). सहाय्यक यांचे मानधन हे तहसिलदार स्तरावरुन सहाय्यक यांनी मोबाईल ॲप मध्ये नोंदणी करते वेळी दिलेल्या बँक खात्याच्या माहिती नुसार त्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीने हंगाम संपल्यावर जमा करण्यात येईल.

**१३.६** महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या ओनर्स प्लॉटच्या संख्येनुसार "**परिशिष्ट-अ**" प्रमाणे तिन्ही हंगामात मिळून रु.८१,८३,९६,२५०/- (अक्षरी रुपये एक्याऐंशी कोटी त्र्याऐंशी लाख शह्याण्णव हजार दोनशे पन्नास) इतका खर्च दरवर्षी अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ६० टक्के निधी केंद्र शासन डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन योजनेतून उपलब्ध करुन देणार आहे. उर्वरीत ४० टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहील. सदरचा निधी कृषि विभागाने जमाबंदी आयुक्त यांना दरवर्षी उपलब्ध करुन द्यावा. तसेच, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, कार्यालयीन खर्च, संगणक प्रणाली विकसन व अनुषंगिक खर्च आणि भविष्यात ओनर्स प्लॉटच्या संख्येत वाढीमुळे होणारी खर्चात वाढ इत्यादी खर्चास मान्यता देण्याचे अधिकार सुकाणू समितीस राहील.

**१४. भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे** (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map) **यांचा माहिती संचः-**

महाराष्ट्र राज्यामध्ये भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे हे सर्वे क्रमांकांच्या माहितीसह उपलब्ध आहेत. सदर भूसंदर्भाकीत गाव नकाशे सद्यस्थितीत पिकपहाणीसाठी वापरण्यात येतात. 'ई मोजणी २.०' या नवीन मोजणीच्या Software प्रणालीचा वापर करुन जे भूभाग नव्याने मोजण्यात येतील त्यांचे भूसंदर्भ देखील या गाव नकाशांमध्ये समाविष्ट करण्याचे कामकाज महसूल व वन विभागाने करावे. यासाठी वेगळ्या खर्चाची आवश्यकता नाही.

१५. सदर योजनेंतर्गत Data Creation च्या अनुषंगाने आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सूचना महसूल व वन विभागाने निर्गमित कराव्यात. तसेच Data Usage च्या अनुषंगाने आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासन मान्यतेने निर्गमित कराव्यात.

१६. शेतकरी माहिती संच, माहिती निर्मिती कक्ष व माहिती वापर कक्ष यासाठी आवश्यक मनुष्यबळ व त्यांचे मानधन, कार्यालयीन खर्च, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, संगणक प्रणाली विकसन, क्लाऊड सेवा, योजना मोहिम स्वरुपात राबविणे इत्यादी बाबींसाठी आवश्यक निधी सुकाणू समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या

PM-KISAN योजनेच्या Administrative Fund मधून जमाबंदी आयुक्त व आयुक्त, कृषि यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७. ॲग्रिस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर) या योजनेचे महत्व व उपयुक्तता लक्षात घेऊन उपरोक्त योजना राज्यात निश्चित कालबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी आणि जिल्ह्यातील विविध विभागातील अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१८. ॲग्रिस्टॅक योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश, मार्गदर्शक सूचना इत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महसूल/कृषि विभाग यांच्या स्तरावरुन क्षेत्रिय कार्यालयांना कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत.

१९. ॲग्रिस्टॅक योजनेसाठी कृषि विभाग हा नोडल विभाग असेल. तर जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य नोडल अधिकारी असतील.

२०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९५/२०२४/कार्यासन १४३१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६५/२०२४/व्यय-१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायांनुसार तसेच मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

२१. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४१०१४०८५९४०८००१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA
MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=04f6ff0d1ef522f4e19358cfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F49173DCDA3F795FF41A69777F5A6C2DED24F621CD434ABBB169565D1ABDAA1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2024.10.14 13:50:59 +05'30'

**( सुजाता सौनिक )**

**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

६. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
७. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधीपक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य
१०. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, महाराष्ट्र, मुंबई
१३. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. अधिदान व लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
१८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. सर्व विभागीय कृषि सह संचालक, महाराष्ट्र राज्य
२५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२६. सर्व तहसिलदार
२७. उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. अवर सचिव / कक्ष अधिकारी (२-अे, ११-अे, १४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवडनस्ती -१० अे.

******

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-अ

| एकूण गावांची संख्या | एकूण ओनर्स प्लॉट संख्या | खरीप | रब्बी | उन्हाळी | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | एकूण (x १५) |
| ११,११५ | २५० | १,३८,९३,७५० | १,३८,९३,७५० | १,३८,९३,७५० | ४,१६,७१,२५० |
| १०,४११ | ५०० | २,६०,२७,५०० | २,६०,२७,५०० | २,६०,२७,५०० | ७,८०,८२,५०० |
| १०,४५८ | १,००० | ५,२२,९०,००० | ५,२२,९०,००० | ५,२२,९०,००० | १५,६८,७०,००० |
| ४,७८४ | १,५०० | ३,५८,८०,००० | ३,५८,८०,००० | ३,५८,८०,००० | १०,७६,४०,००० |
| ४,८२० | ३,००० | ७,२३,००,००० | ७,२३,००,००० | ७,२३,००,००० | २१,६९,००,००० |
| १,३९७ | ४,५०० | ३,१४,३२,५०० | ३,१४,३२,५०० | ३,१४,३२,५०० | ९,४२,९७,५०० |
| ५४८ | ६,००० | १,६४,४०,००० | १,६४,४०,००० | १,६४,४०,००० | ४,९३,२०,००० |
| २४४ | ७,५०० | ९१,५०,००० | ९१,५०,००० | ९१,५०,००० | २,७४,५०,००० |
| १२३ | ९,००० | ५५,३५,००० | ५५,३५,००० | ५५,३५,००० | १,६६,०५,००० |
| १९७ | १०,००० | ९८,५०,००० | ९८,५०,००० | ९८,५०,००० | २,९५,५०,००० |
| | | **२७,२७,९८,७५०** | **२७,२७,९८,७५०** | **२७,२७,९८,७५०** | **८१,८३,९६,२५०** |
| | | | | Central Govt. ६०% | **४९,१०,३७,७५०** |
| | | | | State Govt. ४० % | **३२,७३,५८,५००** |

******